**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ मधील निशाण १५७ वरील आदेश**

CNR: MHSI05-000253-2018

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ७६ तर्फे दाव्यावर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक ४/२/२०१९ रोजी त्यांना दाव्याचे समन्स व तुर्तातुर्त ताकिद अर्जाची नोटीसची बजावणी करण्यात आली तेव्हापासून आजमितीपर्यंत म्हणजे १६८ दिवसांचा कालावधीत कैफियत देणे शक्य झाले नाही. या कालावधीत प्रतिवादी हे आजारी असल्याने, हिडणे—फिरणे शक्य नसल्याने कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. त्यांची कैफियत स्विकारली न गेल्यास ते न्यायापासून वंचीत राहतील व त्यांची बाजु न्यायपटलावर न येता त्याचे विरुध्द आदेश पारित होतील. उलटपक्षी, त्याला बाजु मांडण्याची संधी दिली गेल्यास दाव्याच्या गुणदोषावर निवाडा करणे सोयीस्कर होईल. सबब, त्याला कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी मागणी त्याने केली आहे. या अर्जावरच वादीने आपले म्हणणे दिलेले असून, त्याने असे कथन केले आहे की सदरचा अर्ज हा धादांत खोडसाळ असून तो मान्य नाही. अर्जातील विलंबाबाबत नमूद केलेली कारणे खोडसाळ आहेत. सबब, अर्ज फेटाळावा अशी मागणी वादीने केली आहे.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादीला त्याचे म्हणणे मांडायला देणे गरजेचे आहे असे मला वाटते. सबब, प्रतिवादी क्र. ७६ यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी दयायला हवी. तसे न केल्यास त्यांना त्यांची बाजु मांडण्यापासुन वंचीत ठेवल्यासारखे होईल. सबब, एकंदरीत परिस्थितीमध्ये न्यायाचा हेतुस्तव मी खालील आदेश पारित करतो.

१. प्रतिवादी क्र. ७६ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून याकामी कैफियत स्विकारण्यात येते.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by Vinayak Dattatray Patil
Date: 2019.11.29 13:01:28 +0530

दिनांक— २२/८/२०१९

विनायक द. पाटील
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.